

M 5, Advt.

http://www.e-mahanagar.com

आपलं महानगर

March 13, 2010

# मेट, स्केट गोऽऽ



मेट रिशीकुल विद्यालयाची पाणी-वाचवा स्केट रॅली!

**ग्लो**बल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर पाणी वाचवणं ही काळाची गरज ठरली आहे, हे आपण सारे जाणतोच; पण खऱ्या अर्थाने याचं महत्व जाणलंय मेट रिशीकुल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी!

शनिवार, ६ मार्च रोजी मेट रिशीकुल विद्यालयाने आयोजित केली एक आगळी-वेगळी पाणी वाचवा मोहीम. या मोहीमेअंतर्गत ४ ते ११ वयोगटाचे सुमारे ७५ रिशीकुल विद्यार्थी पर्यावरण रक्षणासाठी आपल्या स्केट्सवर धावले! सकाळी ६.०० वा. दादर, शिवाजी पार्क येथे सुरू झालेली ही रॅली ५ कि.मी. चा पल्ला गाठत बांद्रा रेक्लेमेशन येथे संपन्न झाली.

या अनोख्या रॅलीची कल्पना आपल्याला कशी सुचली हे विचारल्यावर मेट रिशीकुल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, मल्लीका कोटीयन म्हणतात ''अनिश्चीत पावसाळा आणि वाढता उन्हाळा पाहता, पाणी वाचवणं अपरिहार्य ठरलं आहे. अधिकाधिक लोकांनी 'पाणी वाचवणं' हे आपलं कर्तव्य मानून चांगल्या सवयी अंगी बाणाव्यात, हेच या रॅलीचं उद्दीष्ट!''

मुंबईचे रस्ते पाहता, मुलांसाठी ही रॅली पार पाडणं म्हणजे एक मोठं आव्हानच होतं; पण, त्यांची चार महिन्यांची मेहनत आणि आत्मविश्वासापुढे साऱ्या अवघड गोष्टी क्षुल्लक वाटु लागल्या. त्यांच्या आत्मविश्वासाची पोचपावती देताना मेट लिग ऑफ कॉलेजचे ट्रस्टी श्री सुनील कर्वेसांगतात, ''मी स्वतः या मुलांना मेट स्केटींग रींगमध्ये घाम गाळताना पाहिलंय. त्यांचं मनोबल पाहून नवल तर वाटतंच; पण नव्या पिढीतही समाजसेवेचा अंकुर फुटताना पाहुन समाधानही वाटतं.''

खरंच, या चिमुरड्या नागरिकांची सुजाणता पाहुन आपणही थोडं सुजाण आणि जबाबदार बनायला काहीच हरकत नाही, नाही का?

प्रियांका सुर्वे-९८१९६४८८२९
leopiya@gmail.com